# स्वप्नातल्या कळ्यांनो

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2508



REFBK-0024189
REFBK-0024189

म. पं. भावे

संदर्भ काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०४
वा. क्र. २४९८८
काव्य १५१४८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२५०४
२४९८९
७७४४८४

# स्वप्नातल्या कळ्यांनो

म. पां. भावे

REFBK-0024189
REFBK-0024189

अभिनव प्रकाशन

प्रकाशक :
वा. वि. भट
अभिनव प्रकाशन
५३, गुरुनानक मार्केट,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४.

©
सौ. शैलजा भावे
४६, आनंदाश्रम कॉलनी,
नौपाडा, ठाणे–२.

मुखपृष्ठ :
श्री. अरुण ठाकूर

प्रथमावृत्ती
२५ मार्च १९८४

मुद्रक :
वि. स. जोशी
श्री समर्थ प्रिंटिंग प्रेस,
ट्रेझरी ऑफिससमोर,
ठाणे ४०० ६०१.

किंमत वीस रुपये

## प्रिय रसिकांनो—

भावगीतकार म्हणून थोडीशी मान्यता पावलेला मी अेक कवि. संसाराच्या ओढाताणीत संसाररथाची गाडी मार्गावर आणता आणता ४० वर्षे उलटली. त्यानंतर स्फुरले ते भावगीत. १९६४ मधे मी आकाशवाणीचा मान्यवर कवि झालो. म्हणजे वयाच्या ४० व्या वर्षी. अर्ध्याहून अधिक आयुष्याची रेषा ओलांडल्यानंतर. साहजिकच अन्य लेखनापेक्षा भावगीतांकडे लक्ष देणे प्राप्त झाले. त्या उत्साहापोटी लिहिलेली ही भावगीते. अवघ्या १०–१५ वर्षातली.

१९७४ साल उजाडले. अन् प्रकृतीने रट्टे मारायला सुरुवात केली. वाचन, लेखन, चळवळ, प्रवास, नोकरी सर्वांवर बंधने आली. नोकरीचा राजीनामाही लौकरच दिला. साडेसात वर्षे हा त्रास भोगला. नियतीचा दुष्टावा संपला. आता पुन्हा थोडा नवा हुरुप आला आहे. तरीपण या अल्पशा काळात लिहिलेल्या भावगीतांनीही मला भरभरुन दिले. काही गाणी खूप लोकप्रिय झाली. रसिकांना "म. पां. भावे" हे नांव सुपरिचित झाले. कौतुक करणारी मंडळी भेटली. पत्रेही खूप आली. मग नाराज कशाला होअू ?

अुत्तम संगीत दिग्दर्शक व अुत्तम गायक, या दोन मजबूत पंखांच्या साहाय्याने मी रसिकांपर्यंत पोचलो. पुढची वाटचाल नियतीला ठाअूक. म्हणूनच मला 'गीतकार' म्हणून समर्थपणे अुभे करणाऱ्या सर्व संगीत दिग्दर्शकांचा–गायकांचा व रसिकांचा मी अतिशय आभारी आहे. असाच लोभ कायम असावा ही अपेक्षा.

या गीतांचे मूल्यमापन कुणी करावे या अपेक्षेने मी ती लिहिली नाहीतच. तरीपण कुणी चांगले वा वाईट, असे त्याचे मूल्यमापन केलेच, तरी त्याचेही माझ्याकडून स्वागतच होईल, कारण प्रयत्नांना नियतीची साथ असेल तरच नराचा नारायण होतो यावर आता माझा ठाम विश्वास आहे.

तेव्हा, रसिक मित्रांनो, ही अल्पस्वल्प कलाकृती आपणापुढे ठेवली आहे. ती अुदार मनाने गोड मानून घ्याल ही खात्री.

आपला स्नेहांकित,

**म. पां. भावे**

# अनुक्रमणिका


| कवितेचे नांव | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- |
| १ जय जय मयुरेश्वरा | १ |
| २ लावण्य चांदण्याचे | २ |
| ३ रंगात गीत येता | ३ |
| ४ दिव्यापरी मी जळते आहे | ४ |
| ५ दिनरात अैकते मी | ५ |
| ६ रेशमी पावलांनी तू घरात यावे | ६ |
| ७ नी अजून स्वप्नी | ७ |
| ८ सोबतीला तूच होती | ८ |
| ९ मी न माझा राहतो | ९ |
| १० असता तुझी कृपा रे | १० |
| ११ थंडगार वारा आहे | ११ |
| १२ अश्रुबिंदु का ओघळले ग | १२ |
| १३ अजुनी नाही धुके निवळले | १३ |
| १४ हा मस्त धुंद वारा | १४ |
| १५ कुणी छेडिती सतार | १५ |
| १६ तिरप्या तुझ्या कटाक्षे | १६ |
| १७ फुलांनी गंध शिंपावा | १७ |
| १८ धुवाधार तो पाउस होता | १८ |
| १९ नवल बा ऐसे कधि घडियेले | १९ |
| २० मुखी माझ्या राहो, हरीचा अभंग | २० |
| २१ का घालिशी उखाणा | २१ |
| २२ मज देशासाठी लढणे | २२ |
| २३ झाली पहाट पहाट | २३ |
| २४ संपले ते सर्व धागे | २४ |
| २५ का शापिलेस राया | २५ |
| २६ आठवते का गीत आपुले | २६ |
| २७ गाणे खुषीत गाते | २७ |
| २८ श्रीरामा तू दैवत माझे | २८ |
| २९ प्रीती हसे खुषीत | २९ |
| ३० आठवते का सांज तुला ती | ३० |
| ३१ खेळ आपुला रंगत होता | ३१ |
| ३२ तू हळूच म्हटले गाणे | ३२ |
| ३३ भेटला गे सजण मजला | ३३ |
| ३४ हरिनामाच्या जयजयकारे | ३४ |
| ३५ प्रीत कळी सांग कधी | ३५ |
| ३६ जिंकिलेस तू प्रिये मला | ३६ |
| ३७ ही रात जिवलगा | ३७ |
| ३८ धरिलास का अबोला | ३८ |
| ३९ मी तर त्याची झाले ग | ३९ |
| ४० सखे ग येतील ते माघारी | ४० |
| ४१ हासलीस अेकदाच | ४१ |
| ४२ आला वसंत आला | ४२ |
| ४३ मी स्वप्न रंगवीतो | ४३ |
| ४४ करितो अखंड सेवा | ४४ |
| ४५ रात्र होती चांदणी | ४५ |
| ४६ तो दिवस अजूनी आठवतो का तुला | ४६ |
| ४७ अबोलिचे अन् फूल लाजता | ४७ |
| ४८ वृथा प्रभूनामे आम्ही बडवितोच टाळ | ४८ |
| ४९ माळ अंतरी जपते | ४९ |
| ५० ओठात गीत आले | ५० |
| ५१ स्वप्नातल्या कळ्यांनो | ५१ |
| ५२ ध्यास माझा वेगळा | ५२ |
| ५३ मी वात होउनि जळते | ५३ |
| ५४ भंगल्या हृदयात आता | ५४ |
| ५५ समई उदास झाली | ५५ |
| ५६ स्वरवीणा छेडित ये | ५६ |
| ५७ डोळेच बोलतात | ५७ |
| ५८ पाहतेच वाट तुझी | ५८ |
| ५९ सोशीत थंडि वारा | ५९ |
| ६० फुलांनी गंध शिंपावा | ६० |
| ६१ चंद्रही भारावला | ६१ |
| ६२ तू लाजली झकास | ६२ |
| ६३ धुंद होउनी गाते | ६३ |
| ६४ सुमने फुलून आली | ६४ |
| ६५ उगवे उदास प्राची | ६५ |
| ६६ सहजी जुळून आले | ६६ |
| ६७ चांदण्या झेलू नको | ६७ |
| ६८ सरून गेले दिन... मंतरलेले | ६८ |
| ६९ मी तुझ्या गे पैंजणाचा | ६९ |
| ७० वीणेतल्या स्वरांनो | ७० |
| ७१ गाउ नका कोणीही | ७१ |
| ७२ गाणे तुझेच यावे | ७२ |



'स्वप्नातल्या कळ्यांनो' चे संगीतकार अनिल मोहिले यांच्या
समवेत म. पां. भावे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०७
दा. क्र. २७१८९
काव्य ९७०३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## जय जय मयुरेश्वरा

विघ्नांचा तू विघ्नविनाशक, जयजय मयुरेश्वरा
विनम्रभावे वंदन तुझिया, चरणीं ॐकारा ॥

वक्रतुंड तू श्रीलंबोदर
बुद्धीचा तू अथांग सागर
जनहितकर्ता तू परमेश्वर
तुझ्या कृपेने कार्यसिद्धिही, येओ आकारा ॥१॥

शुभमंगल तव नाम 'गजानन'
गिरिजेचा तू असशि नंदन
प्रेमभराने करिता पूजन
नाहि सुखाला उणे कधीही, अमुच्या संसारा ॥२॥

श्रद्धाभावे तुज आवाहन
पतितांना तू करिशी पावन
स्मरुनी तुजला करितो वंदन
सकल जनांचे होवो, मंगल देवा विघ्नेश्वरा ॥३॥

## लावण्य चांदण्याचे

दिसताच तू समोरी, म्हणतोच मी हसून
लावण्य चांदण्याचे, आलीस का पिऊन ।।

माझ्या मनास छंद, तव रूप पाहण्याचा
आकंठ पाहुनीया, अतृप्त राहण्याचा
करितो गुन्हा तरीही, बघतोच मी फिरून
लावण्य चांदण्यांचे, आलीस का पिऊन ।।१।।

कुणि चित्रकार दर्दी, घेऊन कुंचल्यास
रेखाटण्यास येता, हरवेल तो स्वतःस
सौंदर्यशालि चित्र, राहील गे अपूर्ण
लावण्य चांदण्याचे, आलीस का पिऊन ।।२।।

वेलीतल्या फुलांनी, येथे विनम्र व्हावे
सूरातल्या स्वरांनी, पुढती तुझ्या नमावे
स्वर्गीय अप्सरांनी, जावे सखे रुसून
लावण्य चांदण्याचे, आलीस का पिऊन ।।३।।

---

● संगीत : श्रीनिवास केसकर ● गायक : चंद्रशेखर गाडगीळ

## रंगात गीत येता

रंगात गीत येता, सम नेमकी चुकावी
मी छेडिताच वीणा, का तार गे तुटावी ।।

ओठावरील आसू, हासूत का बुडावे
हृदयामधील भाव, कंठात का रुतावे
फुलल्याविनाच का गे, कोणी कळी खुडावी
मी छेडिताच वीणा, का तार गे तुटावी ।।१।।

अनवाणि चालले ना, काटा तरी रुतावा
येता अशी प्रचिती, हा भोग का म्हणावा
आशेहुनीच भोग, व्हावाच का प्रभावी
मी छेडिताच वीणा, का तार गे तुटावी ।।२।।

स्वप्नील लोचनांनी, मी चांदणेच प्याले
आकंठ डुंबुनीया, सुखसागरात न्हाले
जागेपणीच हाती, का दग्धताच यावी
मी छेडिताच वीणा, का तार गे तुटावी ।।३।।

---

• संगीत – बाळ चावरे • गायिका – माणिक भिडे

## दिव्यापरी मी जळतें आहे

अर्ध्या मिटल्या नयनी सखया, तुझी पाहते वाट
दिव्यापरी मी जळते आहे, साहत विरही रात ।।

रात्री मागुनि सरल्या रात्री, भिजली माझी अुशी
वाट पाहते येअुनि मजला, घेशील केव्हा कुशी
मानस कलिका खुलेल होता, प्रीतीची बरसात
दिव्यापरी मी जळते आहे, साहत विरही रात ।।१।।

गंधफुलांची मृदुलकुंतली, वेणी ना माळिली
आवडत्या तव साडीची मी, घडी नसे मोडिली
खुलेल कैसे सांग चांदणे, नसता रजनीनाथ
दिव्यापरी मी जळते आहे, साहत विरही रात ।।२।।

दूर जोगिया कुणी गातसे, आलापित सूर
गोड सुरांची गोड सुरावट, करिते मज जर्जर
कसे सुचावे गीत मनाला, असता मी विरहात
दिव्यापरी मी जळते आहे, साहत विरही रात ।।३।।

## दिनरात अैकते मी

दिनरात अैकते मी, माझीच रे विराणी
ओठावरील सारी, गेली सुकून गाणी ॥

अुधळून शब्द सुमने, केलास तू बहाणा
समजून प्रीत त्याला, मी गायिला तराणा
ते सर्व आठवीता, नयनात येत पाणी
ओठावरील सारी, गेली सुकून गाणी ॥१॥

संवाद सुखद सारे, बघ जाळिती मनाला
वेलीतल्या फुलांना, सोडून गंध गेला
मी भोगितेच आता, थट्टाच जीवघेणी
ओठावरील सारी, गेली सुकून गाणी ॥२॥

झडला गुलाब सारा, अुरलेत फक्त काटे
नक्षी झडून गेली, अुरलेत रंग खोटे
चैतन्यहीन आता, अुरली असे कहाणी
ओठावरील सारी, गेली सुकून गाणी ॥३॥

● संगीत – बाळ बरवे ● गायिका – कविता कृष्णमूर्ती

## रेशीम पावलांनी तू या घरात यावे

माझ्या मनी वसे जे, ते स्वप्न सत्य व्हावे
रेशीम पावलांनी, तू या घरात यावे ॥

फुलत्या कळी समान, तव हासणे गुलाबी
माझ्या मनास तेव्हा, चढते नवी शराबी
डोळ्यात प्रेमिकांनी, संकेत साठवावे
रेशीम पावलांनी, तू या घरात यावे ॥१॥

क्षितिजास टेकतांना, तो सूर्य म्लान होतो
पूर्वेस त्याच वेळी, बघ चंद्रमाच खुलतो
हलकेच चांदण्याने, हे विश्व पांघरावे
रेशीम पावलांनी, तू या घरात यावे ॥२॥

तूझ्याच पावलांचे, ते नाद पैंजणाचे
ऐकून धुंदतेने, मनिचा मयूर नाचे
माझ्याच जीवनाचे, संगीत तूच व्हावे
रेशीम पावलांनी, तू या घरात यावे ॥३॥

## मी अजून स्वप्नी

घडणारे सारे घडून गेले पुरते
मी अजून स्वप्नी, खुळ्यापरी का रमते ॥

आसमंत सारा, भासे शून्य भयाण
ना वृक्षावरती, अेकहि हलते पान
का जुन्या स्मृतींना, आठवुनी मी रडते
मी अजून स्वप्नी, खुळ्यापरी का रमते ॥१॥

हळुवारपणाने, जपली होती प्रीत
परि विपरित तोही, विपरित त्याची रीत
भ्रमराच्या नादे, फूल बिचारे फसते
मी अजून स्वप्नी, खुळ्यापरी का रमते ॥२॥

त्या शपथा हळव्या, हळवे प्रेम उखाणे
ते होते केवळ, फसवे धूर्त बहाणे
ना गुन्हा तरीही, शापित जीवन जगते
मी अजून स्वप्नी, खुळ्यापरी का रमते ॥३॥

● संगीत – अशोक पत्की ● गायिका – उषा मंगेशकर

## सोबतीला तूच होती

रक्ताळले पाय माझे, काटे कितीदा बोचले
सोबतीला तूच होती, म्हणुनि सारे साहिले ।।

ना कुणाला दुःख व्हावे, हीच होती भावना
त्याचसाठीं सोशिल्या मी, साहसाने यातना
सद्‌गुणांच्या अमृताला, त्यांनी इथे लाथाडिले
सोबतीला तूच होती, म्हणुनि सारे साहिले ।।१।।

हासवाया या जगाला, कष्टलो रात्रंदिनी
हाय माझे दैव उलटे, ना इथे माझे कुणी
आपले म्हटले जयांना, पाठमोरे ते जाहले
सोबतीला तूच होती, म्हणुनि सारे साहिले ।।२।।

नम्रतेने बोललो अन्, तुच्छता मी झेलली
धर्म अपुला सोडुनीया, चांदणे दे काहिली
शापिताचे भोग सारे, मीच म्हणुनी भोगिले
सोबतीला तूच होती, म्हणुनि सारे साहिले ।।३।।

## मी न माझा राहतो

मी तिच्या हातात जेव्हा, हात प्रेमे गुंफितो
चांदण्यांच्या सागरीं मी, तृप्ततेने पोहतो ।।

निंदकांचे मर्मभेदी बाण, सलता अंतरी
चंदनी स्पर्शात तिचिया, दुःख सारे विसरतो ... १

ग्रीष्मऋतुची तिरिप दाहक, अंग सारे पोळवी
मखमली शब्दात तिचिया, मी सुखाने डुंबतो ... २

भावनांचा कोंडमारा, खिन्नता आणी मना
ती सुगंधी रात्र येता, मी न माझा राहतो ... ३

## असता तुझी कृपा रे

असता तुझी कृपा रे, ये अर्थ जीवनाला
देवा तुझ्या दयेचा, आधार पामराला ।।

घरटे कसे रचावे, हे ज्ञान पाखरांना
माते उरीं दुधाचा, तू निर्मिलास पान्हा
शय्या कधी फुलांची, काटे कधी उशाला
देवा तुझ्या दयेचा, आधार पामराला ... १

रचिलेस विश्व भव्य, तू जादुगार मोठा
झाला नरास दंभ, मानी स्वतःस मोठा
दैवात काय आहे, हेही कळे न त्याला
देवा तुझ्या दयेचा, आधार पामराला ... २

पाऊस, थंडि, वारा, तूझाच हा पसारा
शरणागतास अंती, तूझाच रे निवारा
तुझिया कृपाप्रसादे, नाही उणे सुखाला
देवा, तुझ्या दयेचा, आधार पामराला ... ३

---

• संगीत व गायक – दशरथ पुजारी

## थंडगार वारा आहे

कधी उष्ण लाटा करिती, दाह जीवनाचा
थंडगार वारा वाहे, कधी चांदण्याचा ॥

एक रडे, हसतो दुसरा, अर्थ काय याचा
वाळवंट तुडवित जाणे, भोग हा कुणाचा
जीवनात चाले सगळा, खेळ संचिताचा
थंडगार वारा वाहे, कधी चांदण्याचा ... १

आप्तमित्र धरिती सगळे, अुगा वैरभाव
कुणी दीन पोटासाठी, सोशितोच घाव
अंबरास साज कधी त्या, इंद्रधनुष्याचा
थंडगार वारा वाहे, कधी चांदण्याचा ... २

सुखालाच देअुनि फाटा, कुणी करी सेवा
आळसास बनवुनि मित्र, कुणी करी हेवा
कुणा घरी सुटतो गंध, चंदनी फुलांचा
थंडगार वारा आहे, कधी चांदण्याचा ... ३

● संगीत – विजय करंदीकर ● गायक – आनंद माडगूळकर

## अश्रुबिंदु का ओघळले ग

अश्रुबिंदु का ओघळले ग, नयनातुन खाली
मांगल्याने भरला मळवट, आज तुझ्या भाली ।।

सुरेल सनई गीत गातसे, भावी कालाचे
स्त्री सुमनाचे पुष्प येथुनि, विकसित व्हायाचे
पूस लोचनें, आवर अश्रू, तू तर धीराची
मांगल्याने भरला मळवट, आज तुझ्या भाली ... १

देवर्षींना स्मरुनि घातले, कोमल कंठी हार
हासत खेळत करा आपुला, सोन्याचा संसार
जन्मभरीची होसि देवता, त्यांच्या चित्तातली
मांगल्याने भरला मळवट, आज तुझ्या भाली ... २

सुखदुःखाचे होउनि साथी, घडवा मंगलधाम
दोन मनांची जुळणी व्हावी, जैसे जानकिराम
पती संगती नित्य राहसी, होउनिया सावली
मांगल्याने भरला मळवट, आज तुझ्या भाली ... ३

## अजुनी नाही धुकें निवळले

अजुनी नाही धुके निवळले, सूर्य न दिसला कमलफुला
अजुनी नाही पुरता कळला, तुझ्या मनातिल भाव मला ॥

श्रावणातल्या सरी परी तू, हसुनि दाविशी अल्लडता
कुंद हवेपरि मुग्ध होउनी, कधी धरिशी तू मौनव्रता
कधी फुलविसी लाडिक बोलुनि, प्राजक्ताचा गंध मळा
अजुनी नाही पुरता कळला, तुझ्या मनातिल भाव मला ... १

बागडसि कधि स्वच्छंदाने, हरिणाहुनिही मुक्तपणे
मृदुल होउनी मोर पिसासम, प्रीत खुलविसी सहजपणे
मधेच जातो सूर तुझा ग, जणू फुलोरा मरगळला
अजुनी नाही पुरता कळला, तुझ्या मनातिल भाव मला ... २

खेळलास ना माझ्यासंगे, लपंडाव तू आम्रवनी
झाकिलेस ना नयन अेकदा, तुझिया कोमल हातांनी
करात कर कायमचा द्याया, हात तुझा का अडखळला
अजुनी नाही पुरता कळला, तुझ्या मनातिल भाव मला ... ३

---

● संगीत – शंकरराव कुलकर्णी ● गायिका – उषा वाघ

## हा मस्त धुंद वारा

हा मस्त धुंद वारा, सुखवी मनास आता
बेहोष रात्र होते, तुझिया मिठीत नाथा ।।

प्रेमें अधीरतेने, तू चुंबिता कपोली
ह्या चांदण्या नभीच्या, हसती हळूच गाली
लाटा धरोनि ताल, गाती सुरेल गीता
बेहोष रात्र होते, तुझिया मिठीत नाथा ... १

मौनातलीच भाषा, गोडी अवीट त्याची
काही न सांगताही, खुलते कळी मनाची
उठतो मधूर नाद, वीणेमधून आता
बेहोष रात्र होते, तुझिया मिठीत नाथा ... २

फुलल्या सुगंधी पुष्पें, सजली सुरेख शय्या
येते फुलून अवघी, तव संगतीत काया
व्यापून गगन सारे, बहरे वसंत आता
बेहोष रात्र होते, तुझिया मिठीत नाथा ... ३

● संगीत – पुंडलीक आबोजवार ● गायिका – जयश्री आपटे

## कुणि छेडिती सतार

कुणि छेडिती सतार, कुणि झेलती प्रहार
हाती कुणा निखारे, मिळती कुणास हार ।।

पाऊल टाकतांना, रुतती अनंत काटे
थोडेच भाग्यवंत, घेतात मान मोठे
कुणि बोलती मधाळ, कुणि सोडिती विखार
कुणि छेडिती सतार, कुणी झेलती प्रहार ... १

जन्मासवेच येते, नियतीहि सोबतीला
तालावरी तियेच्या, जगणेच मानवाला
पूर्तीविनाच राही, अिच्छा सदैव दूर
कुणि छेडिती सतार, कुणि झेलती प्रहार ... २

आयुष्य खेळ आहे, हा ऊन सावल्यांचा
हसण्यासवेच येतो, हुंकार दुःखितांचा
कोणी मधेच अडतो, कुणि गाठि पैलतीर
कुणि छेडिती सतार, कुणि झेलती प्रहार ... ३

● संगीत – पुंडलिक आबोजवार ● गायक – वसंत पुरोहित

## तिरप्या तुझ्या कटाक्षे

तिरप्या तुझ्या कटाक्षे, घायाळ मीच झालो
लाडीक हास्य बघुनी, मी बंदिवान झालो ... १

संकेत ते प्रभावी, डोळ्यातले बघोनी
कळलेच ना कसा गे, हरखून मीच गेलो ... २

मौनात बोलणारी, रोमांचकारी भाषा
सहजीच सौख्यडोही, मी न्हाउनी निघालो ... ३

स्वप्नातही करावा, माझाच पाठलाग
ही गोड गोड शिक्षा, भोगीत तृप्त झालो ... ४

फुलत्या कळी समान, फुललीस डोलदार
होऊन भृंग मीही, अमृत खूप प्यालो ... ५

चुंबून लाट जावी, हलकेच गे किनारा
होऊनिया किनारा, मी आज धन्य झालो ... ६

---

• संगीत – पुंडलिक आबोजवार • गायक– वसंत पुरोहित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## फुलांनी गंध शिंपावा

मनीच्या भावना माझ्या, तयांना साक्ष तू झाली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनीं आली ।।

सागरी लाट उसळावी, बघोनी चंद्र आभाळी
मनी जे चित्र होते ग, तयाची पूर्तता झाली
होउनी तेच ते चित्र, सुखे तू या घरी आली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनीं आली ... १

वृक्ष ना अेकटा आता, भोवती कोवळी वेली
रुक्ष या जीवनी माझ्या, फुलांची बाग गे फुलली
खुषीने गीत गातांना, तयाची तान तू झाली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनीं आली ... २

सुखाची पौर्णिमा आता, येअु दे नित्य वाट्याला
कुणाची दृष्ट ना लागो, रेशमी अविट प्रीतीला
झडोनी जीर्ण पर्णेही, सुखाची पालवी आली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनीं आली ... ३

## धुवाधार तो पाउस होता

तो – धुवाधार तो पाउस होता, तूहि ओली मीही ओला
ती – ओलेत्या प्रणयाचा तेव्हा, खेळ आपुला रंगत गेला

तो – चिंबहि झाली होती पाने, रस्ते सारे न्हाउन गेले
डोंगरातुनी झरझर खाली, स्फटीक नाले वाहत आले
ती – थंडगार भिरभिरता वारा, सर्वांगाला स्पर्शुनि गेला
ओलेत्या प्रणयाचा तेव्हा, खेळ आपुला रंगत गेला

तो – मधेच होते जात चुंबुनी, मेघहि तेव्हा डोंगरमाथा
म्हणालीस तू मजला तेव्हा, किती मनोहर दृश्यचि नाथा
ती – त्या सौंदर्या लाजविशी तू, म्हटले मीही त्याच क्षणाला
ओलेत्या प्रणयाचा तेव्हा, खेळ आपुला रंगत गेला

तो – सुखवित होती दोघांनाही, स्पर्शामधली ऊबहि ओली
हळूच कानी पडली तेव्हा, पक्षांचीही फडफड ओली
ती – संपु नये हा खेळ वाटले, पावसातही भिजण्यामधला
ओलेत्या प्रणयाचा तेव्हा, खेळ आपुला रंगत गेला

---

● संगीत– पुंडलिक आबोजवार ● गायक– वासुदेव जोशी, जयश्री आपटे

## नवल बा अैसे कधि घडियेले

विषाच्या वेलीला, आम्रफल आले
नवल बा अैसे, कधी घडियेले ।।

स्वार्थाचे दगड, पायीं रचियेले
परमार्थ मंदीर, वरी अुभारीले
अशा पामराला, प्रभूने तारिले
नवल बा अैसे, कधी घडियेले ... १

मुक्तीच्या सोपाना, अशुद्धाची वीट
अुसळते चित्तीं, पापाचीच लाट
पालथी घागर, पाणी साठवीले
नवल बा अैसे, कधी घडियेले ... २

अंतरात नाही, शुद्ध भक्तिभाव
अशा मंदिरात, राहिल का देव
अहंकारे कधी, मुक्तीला वरिले
नवल बा अैसे, कधी घडियेले ... ३

## मुखी माझ्या राहो, हरीचा अभंग

तन मन व्हावे, तुझ्याठायि दंग
मुखी माझ्या राहो, हरीचा अभंग ॥

चंदन घाशिता, सहाणेस वास
तुझ्या नामे देवा, जीवनी प्रकाश
नाम संकीर्तनी, आनंदी आनंद
मुखी माझ्या राहो, हरीचा अभंग ... १

फुलांची रांगोळी, निसर्गी सुंदर
आकाशी शोभते, ताऱ्यांचे झुंबर
अनंत रुपाने, नटला श्रीरंग
मुखी माझ्या राहो, हरीचा अभंग ... २

चिमणी बांधते, सानुले घरटे
भूमीतून येओ, गोजिरे रोपटे
लुळा वाजवितो, पायाने मृदुंग
मुखी माझ्या राहो, हरीचा अभंग ... ३

## का घालिशी अुखाणा

का खेळशी असा गे, हा खेळ जीवघेणा
चोरून पाहतांना, का घालिशी अुखाणा ।।

आभाळ हे मनाचे, पसरून प्रीत पंख
धुंदीत स्वैर फिरते, शोधीत प्रीत गंध
फिरवून पाठ तूही, करिशी मला दिवाणा
चोरून पाहतांना, का घालिशी अुखाणा ... १

का हासऱ्या फुलाने, व्हावे अुगाच स्तब्ध
मिटल्या कळी परी का, रोखून घेशि शब्द
साथीविणा कधी गे, रंगेल का तराणा
चोरून पाहतांना, का घालिशी अुखाणा ... २

अजुनी खुणावती ह्या, रानामधील वाटा
ज्यांनीच अैकिले ग, अपुल्या सुरेल गीता
आला कळून मजला, हा नाटकी बहाणा
चोरून पाहतांना, का घालिशी अुखाणा ... ३

## मज देशासाठी लढणे

चित्तात असू दे धैर्य, बाहूत असू दे शक्ती
मज देशासाठी लढणे, त्यागातचि माझी मुक्ती ।।

मी जीवन जगतो आहे, ना केवळ पोटासाठी
मज सदैव करणे आहे, सत्कर्म बांधवांसाठी
ते दुःख परांचे सारे, मज शीतल करणे अंती
मज देशासाठी लढणे, त्यागातचि माझी मुक्ती .... १

कधि चढो न मतिला गंज, स्वार्थाची येवो चीड
मोहास बळी ना व्हावे, कीर्तीची नलगे ओढ
न्यायाची ठेवुनि चाड, जगण्यातचि मजला तृप्ती
मज देशासाठी लढणे, त्यागातचि माझी मुक्ती ... २

मज वाचीवीर न होणे, "कृति दक्ष" राहणे सत्य
यश येवो अथवा जावो, सत्यास्तव लढणे नित्य
हा भारत उन्नत व्हावा, ही अढळ असू दे भक्ती
मज देशासाठी लढणे, त्यागातचि माझी मुक्ती ... ३

## झाली पहाट पहाट

गोड गुलाबी थंडीत, मीही तुझ्याच कुशीत
तृण भिजले दंवात, झाली पहाट पहाट ॥

माझ्या कोमल देहाला, तुझ्या अुबेची संगत
श्वास श्वासांचे चालते, मूक पहाट संगीत
तुझ्या विळख्याची मिठी, गोड सुखाचीच लाट
तृण भिजले दंवात, झाली पहाट पहाट ... १

येअी गवाक्षामधून, गंध फुलांचा खोलीत
सुगंधाच्या झुळकेत, नीज तुझ्याच बाहूत
संपू नयेच पहाट, येअी सारखे मनात
तृण भिजले दंवात, झाली पहाट पहाट ... २

आता अुजाडल पुन्हा, जरी झाकला कोंबडा
सूर्य डोकावेल हळू, रंग फेकीत तांबडा
गान गुलाबी प्रीतीचे, गाअी भैरवीचा थाट
तृण भिजले दंवात, झाली पहाट पहाट ... ३

---

• संगीत – श्रीकांत ठाकरे • गायिका – मंगला नाथ

## संपले ते सर्व धागे

हाच होता माळरान, ह्याच होत्या तारका
संपले ते सर्व धागे, राहिली शोकांतिका ।।

खूप येथे बोललो, अन् मुक्ततेने हासलो
देहभाना विसरुनीया, धुंद दोघे जाहलो
सोडुनीया सावलीला, तू पुढे गेलास का
संपले ते सर्व धागे, राहिली शोकांतिका ... १

जाहलासे का गुन्हा रे, सांग माझ्या हातुनी
म्हणुनि व्हावा घात ऐसा, माझिया रे जीवनी
खिन्न काळोखी बुडाली, पूर्णता ही चंद्रिका
संपले ते सर्व धागे, राहिली शोकांतिका ... २

ह्या अथे भारावुनी मी, प्रेमगीते गायिली
दो मनांच्या मीलनाची, रम्यचित्रे रेखिली
कृष्ण जाता निघुनि मागे, खिन्न झाली द्वारका
संपले ते सर्व धागे, राहिली शोकांतिका ... ३

## का शापिलेस राया

झाला अुदास जीव, झाली अुदास काया
अुल्केपरी मला रे, का शापिलेस राया ॥

नव्हताच आसराही, माझ्या मनास कोणी
आशा खुळी दुणावे, सहजी तुला बघोनी
का हासलास तेव्हा, चटका मनास द्याया
अुल्केपरी मला रे, का शापिलेस राया ... १

रेखीत कुंचल्याने, चित्रे नदी किनारी
मी अेकटीच असता, आलास तू समोरी
तव कुंचल्यात आहे, म्हटलेस गोड किमया
अुल्केपरी मला रे, का शापिलेस राया ... २

हुरळून मीच गेले, विसरून कुंचल्याला
झाले अधीर कितिदा, तव रूप पाहण्याला
अवघा प्रकाश विरला, तिमिरी बुडेच संध्या
अुल्केपरी मला रे, का शापिलेस राया ... ३

## आठवते का गीत आपुले

आठवते का गीत आपुले, प्रीतदिवाणे
पक्षीगणही घालित होते, मूक अुखाणे ।।

हिरवळ भवती सांगत होती, गूज काहिसे
परस्परांना दिधले आपण, गोड दिलासे
पाहिलेस ना संध्येचेही, अधीर होणे
आठवते का गीत आपुले, प्रीत दिवाणे ... १

दूरदूरवर धूसर होता, डोंगरमाथा
अंधुक फिक्कट होत्या झाल्या, अपुल्या वाटा
धुंद होअुनी मस्त गायिलो, अेकदिलाने
आठवते का गीत आपुले, प्रीत दिवाणे ... २

आतुर होत्या लुकलुकणाऱ्या, लक्ष तारका
आशिस द्याया प्रेमभराने, दोन प्रेमिका
फुलून आले अंतर तेव्हा, किती खुषीने
आठवते का गीत आपुले, प्रीत दिवाणे ... ३

## गाणे खुषीत गातें

गगनातली निळाई, आकंठ पिउन घेते
माझ्या प्रियासवे मी, गाणे खुषीत गाते ।।

रेखाटते सुरेख, हातावरील मेंदी
हातात हात घेता, चढते मनास धुंदी
हळुवार शब्द त्याची, कविता बनून जाते
माझ्या प्रियासवे मी, गाणे खुषीत गाते ... १

या सावल्या लतांच्या, किलबिल पाखरांची
नक्षी खुलून दिसते, तेथे फुलाफुलांची
या रम्य आसमंती, प्रीतीस येअि भरते
माझ्या प्रियासवे मी, गाणे खुषीत गाते ... २

मोहोर भावनांचा, अंगातुनी फुलावा
त्याच्या स्वरामधूनी, माझाच सूर यावा
बेहोष मैफलीने, जडले अतूट नाते
माझ्या प्रियासवे मी, गाणे खुषीत गाते ... ३

## श्रीरामा तू दैवत माझे

श्रीरामा तू दैवत माझे, अनंत कोटि प्रणाम
ओठावरती सतत राहु दे, तुझेच मंगल नाम ।।

कधी सुरावट हास्य रसाची
कधी वेदना करुण रसाची
चुकु न द्यायची सम धैर्याची, तारक आहे राम ... १

आयुष्यातिल गणिते अवघड
कधी चढण वा, असेल अुतरण
साप शिडीचा खेळ जिंकण्या, हृदयि असावा राम ... २

मनोरथांचे अुंच मनोरे
अुन्मळून जरि पडले सारे
स्थितप्रज्ञता येते अंगी, स्मरता श्रीप्रभुराम ... ३

राम नाम हा मंत्र युगाचा
दीपस्तंभ हा भक्तजनांचा
मनःशांतिस्तव म्हणा सदोदित, अखंड 'जयजयराम' ... ४

## प्रीती हसे खुषीत

बहरून भाव आले, प्रीती हसे खुषीत
जुळल्या सुरात तारा, जुळले सुरेल गीत ॥

अश्रूत दाटलेल्या, स्वप्नास अर्थ आला
हलकेच गंध जाओी, पवनास चुंबिण्याला
हिरवेपणांत न्हाले, वैराण वाळवंट
जुळल्या सुरात तारा, जुळले सुरेल गीत ... १

गगनी विहार करिती, स्वच्छंद ते विहंग
पुष्पातला मधूही, लुटतात मुक्त भृंग
दीपास आज सुचले, प्रीतीतले सुनीत
जुळल्या सुरात तारा, जुळले सुरेल गीत ... २

पानावरी फुलांनी, रेखीयलीच नक्षी
आनंद सोहळ्याला, झालाच चंद्र साक्षी
प्राजक्त नाचलासे, मोदेच अंगणात
जुळल्या सुरात तारा, जुळले सुरेल गीत ... ३

## आठवते का सांज तुला ती

आठवते का सांज तुला ती, प्रेम दिवाणी
तुझी नि माझी प्रीत रंगली, याच ठिकाणी ॥

पाउस सांडत होता धारा
थरारलाही होता वारा
माडही तेव्हा गातच होते, सुंदर गाणी
आठवते का सांज तुला ती, प्रेमदिवाणी ... १

कुजबुज अपुली दोघांमधली
ऐकियली लाटांनी सगळी
माळियली तू हळुच कुंतली, गंधित वेणी
आठवते का सांज तुला ती, प्रेमदिवाणी ... २

थेंब टपोरे भिजवुन गेले
अपुली प्रीती फुलवुन गेले
खूप रंगली ओलेतीची, गोड कहाणी
आठवते का सांज तुला ती, प्रेमदिवाणी ... ३

---

• संगीत – राम पटवर्धन • गायक – आशित देसाई

# खेळ आपुला रंगत होता

रसरसलेले थेंब टपोरे, मेघ तेधवा सांडत होता
जलभरल्या त्या धारेमध्यें, खेळ आपुला रंगत होता ।।

गालावरुनी ओघळणारे, स्फटीक बिंदू तू प्राशियले
आणि अचानक माझ्या चित्तीं, गुलाब सुंदर फुलून आले
भिजल्या ओठी, भिजल्या गोष्टी, कोण कुणाला सांगत होता
जलभरल्या त्या धारेमध्ये, खेळ आपुला रंगत होता ... १

दोन मनातिल गोड भावना, चिंब तेधवा भिजून गेल्या
भिजल्या अंगी रोमांचितही, कळ्या लाजऱ्या फुलून आल्या
शहारून तू आनंदाने सुगंधात त्या, नाहत होता
जलभरल्या त्या धारेमध्ये, खेळ आपुला रंगत होता ... २

दुग्धशर्करा मीलनातही, कटूपणाला नसतो वावर
खटयाळ पाउस सांगत होता, 'हवे' पणाचे नाते सुंदर
दूरपणाच्या बंधनातला, बंध तेधवा सरला होता
जलभरल्या त्या धारेमध्ये, खेळ आपुला रंगत होता ... ३

## तू हळूच म्हटलें गाणे

माडांच्या सुंदर ओळी, डुलणारी सुंदर पाने
तो सुंदर सागरतीर, तू हळूच म्हटले गाणे ।।

मी अुभा शांतसा जवळी, तू हासत होती गाली
श्रवणीय मनोहर सूर, अर्थाने नटल्या ओळी
भावना–सुरांची मैत्री, गीताचे झाले सोने
तो सुंदर सागरतीर, तू हळूच म्हटले गाणे ... १

वाऱ्याची रेशिम धून, लाटांची हलकी तान
तव गाणे मंजुळ छान, हरपले अैकुनी भान
स्वप्नील मनाचे कोडे, अुलगडले अल्लडतेने
तो सुंदर सागरतीर, तू हळूच म्हटले गाणे ... २

आकाशी तांबुस नक्षी, अुडणारे लोभस पक्षी
तव सुरेल गीता श्रवणी, जाहलीत सारी साक्षी
गाण्यातिल रंगामधुनी, अनुभवले विश्व दिवाणे
तो सुंदर सागरतीर, तू हळूच म्हटले गाणे ... ३

## भेटला गे सजण मजला

भेटला गे सजण मजला, खूप मी भारावले
धुंद होऊनि जोगियाचे, सूर मी आलापिले ।।

भाववेडी मूक भाषा, अमृतासम मधुरही
जुळून आले सुखद असे, गूज ते संवादही
त्या सुखाच्या भावनेने, नेत्र हे पाणावले
धुंद होउनि जोगियाचे, सूर मी आलापिले ... १

स्वागताला सज्ज होते, लाजुनी दारात मी
गोड हसण्यातून त्याने, प्रीतिची दिधली हमी
रेशमी धाग्यात जुळले, बंध ते प्रेमातले
धुंद होउनि जोगियाचे, सूर मी आलापिले ... २

प्रीतिच्या गंधात तेव्हा, मी मजेने डुंबले
मी सुखाच्या स्वागताला, दारि तोरण बांधिले
स्वप्न माझे आजवरिचे, पूर्ण होउनि हासले
धुंद होउनि जोगियाचे, सूर मी आलापिले ... ३

## प्रीत कळी सांग कधी

प्रीत कळी सांग कधी, उमलणार बहरुनी
मूर्ति तुझी अंतरात, पूजिते मनोमनी ।।

का अुगाच डोळ्यांची, फडफडते पापणी
विरहगीत गात नभी, लुकलुकते चांदणी
स्वप्नातिल कविताही, दंग तुझ्या गायनी
प्रीत कळी सांग कधी, बहरणार उमलुनी ... १

रात्रंदिन वेड्यापरि, ध्यास तुझा अंतरी
गंध ना मिळे मृगास, असुनि जवळि कस्तुरी
अश्रूंच्या ओघळात, भिजत रात्र निशिदिनी
प्रीत कळी सांग कधी, बहरणार उमलुनी ... २

प्रीत नसे माझी रे, वाऱ्यावर विरणारी
वेडी ही प्रीत असे, तुजसाठी झुरणारी
मौनाच्या वेलीला, कधि फुटेल मधुवाणी
प्रीत कळी सांग कधी, बहरणार उमलुनी ... ३

---

• संगीत – मधुकर गोळवलकर • गायिका – सौ. रजनी जोशी

## हरिनामाच्या जयजयकारे

अुठा गड्यांनो अुठा झडकरी, हासत नाचत येअि अुषा
हरिनामाच्या जयजयकारे, भरुनि जाअु द्या दिशा दिशा ।।

सुटला वारा मंद गारवा
हरिनामाचा लुटा गोडवा
प्रभुनामाची पेठ अुघडली नामचि घ्या रे पसा पसा ... १

मंजुळ गायन पक्षी करिती
गीतेचा जणु पाठ वाचिती
कृतार्थ जीवन प्रभुनामाने, पापाचरणी रुसा रुसा .. २

प्रशांत गंधित निवांत समयीं
देवापुढती लावा समओ
प्रभुनामाच्या रंगी रंगुनि, दुःख विसरुनी हसा हसा ... ३

करुनि सुगंधित सारे अंगण
त्यावरि रंगावलिचे चित्रण
मंगल श्रीरामाचा अुठवा, चित्तावरती ठसा ठसा ... ४

## जिंकिलेस तू प्रिये मला

तो – जिंकिलेस तू प्रिये मला
ती – तूच जिंकिले प्रिया मला
दोघे– तुझी नि माझी जुळली संगत, तूच मला अन् मीच तुला

तो – नीलाकाशी हसे चंद्रमा, जाणुनि अपुल्या गुपिताला
साक्ष ठेवुनी तयास आपण, असे गुंफिले प्रीतीला
ती – प्राजक्ताने हर्षभराने सडा सुगंधी शिंपियला
दोघे– तुझी नि माझी जुळली संगत, तूच मला अन् मीच तुला

तो – नवरंगाने बहरे जीवन, गीत प्रीतिचे गातांना
मनात माझ्या फुले मोगरा, तुझ्या संगती असतांना
ती – कृतार्थ झाला गंध अर्पुनी जीवन अपुले भ्रमर फुला
तुझी नि माझी जुळली संगत तूच मला अन् मीच तुला

तो – दोन सुरांच्या अद्वैतातुनि, मैफल रंगे दोघांची
सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर, संगत अपुली जन्माची
ती – वस्तूसंगे जशी सावली, तशीच तू मम साथीला
तुझी नि माझी जुळली संगत, तूच मला अन् मीच तुला

तो – शब्दावाचुनि सहजचि फुलली, कविता अपुल्या प्रीतीची
दोन पाखरे स्वैर मनाने, गीते गाती प्रणयाची
ती – परमसुखाचा बागबगीचा, आनंदाने मोहरला
तुझी नि माझी जुळली संगत, तूच मला अन् मीच तुला

---

• संगीत – बाळ चावरे • गायक – प्रभाकर बह्मे, पद्मजा बर्वे

## ही रात जिवलगा

चंद्रास ठेवुनी साक्ष अुभी मी दारी
ही रात जिवलगा, वैरिण झाली खरी ॥

चांदणे धवल हे, शीत सुगंधित वारा
प्रीतीस सहजचि, बहरुन येत फुलोरा
या सुखद सुवेळी, मला सुखाची चोरी
ही रात जिवलगा, वैरिण झाली खरी ... १

बघ रातराणिचा, गंध दरवळे भवती
हा गंध उजळवी, धुंद प्रीतिची स्मृती
तुजवाचुन सखया, होते मी बावरी
ही रात जिवलगा, वैरिण झाली खरी ... २

हे गीत प्रीतिचे, अडखळते रे ओठी
मन झाले उत्सुक, तुझिया भेटीसाठी
ही तगमग माझी, कुणास सांगू तरी
ही रात जिवलगा, वैरिण झाली खरी ... ३

---

• गायिका – माणिक भिडे

## धरिलास का अबोला

माझ्याच हातुनी का, काही प्रमाद घडला
मज सांग ना सख्या रे, धरिलास का अबोला ॥

आलास तू अवेळी, काही न सांगताही
होतेचि आप्त जवळी, मी लाजलेच काही
अपुले गुपीत अजुनी, ठावे नसे कुणाला
मज सांग ना सख्या रे, धरिलास का अबोला ... १

मौनातली कळी ही, लाजेचि उमलतांना
नाही अजून वाचा, फुटलीच भावनांना
स्वप्नात मी तुला रे, आहेचि शब्द दिधला
मज सांग ना सख्या रे, धरिलास का अबोला ... २

होतो असह्य मजला, हा आगळा अबोला
तूझ्याच प्रीतिचा रे, आधार या खुळीला
मी भाववेडि बाला, सांगू कसे कुणाला
मज सांग ना सख्या रे, धरिलास का अबोला .... ३

## मी तर त्याची झाले ग

सागर मीलन वेडी सरिता, भान हरपुनी धावे ग
नील नभातिल चंद्र हासला, मी तर त्याची झाले ग ।।

प्रीतवेलिला मंगलतेची कळी लाजरी आली ग
गुपित आमुच्या दोघामधले, पवित्र नाते झाले ग
छायेला ना आता उरले, अलग आपुले जीवन ग
नील नभातिल चंद्र हासला, मी तर त्याची झाले ग .. १

धुक्यात होते दडले माझे, रम्य गुलाबी कोडे ग
किती दिसांची मम स्वप्नांची, आज पूर्तता झाली ग
सप्तपदीच्या रूपे चित्ती, इंद्रधनुष्यही उमटे ग
नील नभातिल चंद्र हासला, मी तर त्याची झाले ग ... २

तुफान लाटा, भिववी वारा, नाव आमुची अेकच ग
या नावेतुन हासत खेळत, पैलतिराला जाणे ग
शब्दामागुन अर्थ धावतो, तसेच माझे जीवन ग
नील नभातिल चंद्र हासला, मी तर त्याची झाले ग ... ३

## सखे ग येतिल ते माघारी

सखे ग येतिल ते माघारी
किती दिसांनी, भेटणार मज, माझा शाममुरारी ॥

दो नयनांच्या, पणत्या तेवुनि
काढियल्या मी, रात्री जागुनि
भाव सदोदित, चित्ती ठेवुनि
बहर फुलतसे विरहाअंती, प्रीतीच्या संसारी ... १

असुनि काहिली, ग्रीष्म ऋतूतिल
भाव मनातिल, हसतिल फुलतिल
वठल्या वृक्षा, फुलेहि येतिल
माती होइल गंधित झरता, वळवाच्याही सरी ... २

विरह व्यथेतिल, तीव्र वेदना
स्मरता नच ये, नीज लोचना
मुक्या मनातिल, मूक भावना
आज तयांना नव संजीवन, येणारचि ते घरी ... ३

---

● संगीत– मधुकर गोळवलकर ● गायिका– उषा नाईक, पुष्पा पागधरे

## हासलीस अेकदाच

हासलीस अेकदाच, मजकडेच पाहुनी
घेतलेस सहजपणे, हृदय मात्र चोरुनी ॥

स्वप्नातुन प्रीतीचा, वेणुनाद अैकतो
कल्पनेत रात्रंदिन, तुज समीप राहतो
धुंद चांदण्यात समिर, तान घेअि रंगुनी
हासलीस अेकदाच, मजकडेच पाहुनी ... १

लाजतेस गोड किती, भासतेस कमलिनी
या हळव्या प्रीतीला, साद तुझी साजणी
मूक भाव मौनातिल, गुपित जाति सांगुनी
हासलीस अेकदाच, मजकडेच पाहुनी ... २

पर्णावर तरल थेंब, दंवबिंदूचे दिसती
स्वच्छ भाव चित्तातिल, नेत्रातुन मज कळती
प्रीतीच्या बंधनात, घेतलेस वेढुनी
हासलीस अेकदाच, मजकडेच पाहुनी ... ३

## आला वसंत आला

प्रीती फुलोनि आली, कळले न आपणाला
बघ चोर पावलांनी, आला वसंत आला ॥

ना आठवेच आता, अपुलीच भेट पहिली
नयनामधील कमळे, केव्हा सलज्ज हसली
रेशीम बंधनांनी, कधि वेष्टिले कुणाला
बघ चोर पावलांनी, आला वसंत आला ... १

प्रीतीस कंठ फुटला, गाते सुरात गाणी
साफल्य भावनांनी, नयनात येत पाणी
झाली मनास बाधा, आसावले सुखाला
बघ चोर पावलांनी, आला वसंत आला ... २

हातात हात घालू, दोघे सुखात राहू
येतील आपदाही, दोघे मिळून साहू
आली घडी सुखाची, आलीच भाग्यवेला
बघ चोर पावलांनी, आला वसंत आला ... ३

## मी स्वप्न रंगवीतो

परिणाम काय अंती, ठाऊक हे असोनी
मी स्वप्न रंगवीतो, आतूर लोचनांनी ।।

जो जन्मताच अंध, त्याला कुठून दृष्टी
नियमाविरुद्ध जाणे, हे ओळखे न सृष्टी
पाऊलवाट बुजते, येता धुके जमोनी
मी स्वप्न रंगवीतो, आतूर लोचनांनी ... १

गीतास ताल नसता, बदसूर होय गाणे
फिरताच दैव फासे, आयुष्य हो दिवाणे
पाण्यावरील रेषा, जाणारची पुसोनी
मी स्वप्न रंगवीतो, आतूर लोचनांनी ... २

आभास कल्पनेचा, ते सत्य दूर राही
वाळूतल्या घराला, तिळमात्र आयु नाही
का गुंफितो तरीही, हा बंध रेशमांनी
मी स्वप्न रंगवीतो, आतूर लोचनांनी ... ३

---

● गायक – वसंत पुरोहित

## करितो अखंड सेवा

होओील पूर्तता का, रचिल्या मनोरथांची
करितो अखंड सेवा, मी घेतल्या व्रताची ॥

संकल्प सोडलेला, सत्कर्म पूजिण्याचा
होणार होअु द्या तो, आघात वादळाचा
पाण्यात सूर घेता, का भीति डुंबण्याची
करितो अखंड सेवा, मी घेतल्या व्रताची ... १

गाणे कसे सुचावे, पिचता सुरेल पावा
रुजल्याविणा बियाणे, ना कोंब येअि केव्हा
दुःखातुनी पुढे ये, नित कल्पना सुखाची
करितो अखंड सेवा, मी घेतल्या व्रताची ... २

केव्हा उजाड भासे, हा आसमंत सारा
केव्हा सुरम्य हिरवा, चोहीकडे फुलोरा
यत्नास पाहिजेची, ती साथ संचिताची
करितो अखंड सेवा, मी घेतल्या व्रताची ... ३

## रात्र होती चांदणी

प्रीतिच्या धुंदीत तेव्हा, अवीट होता गोडवा
रात्र होती चांदणी अन्, मस्त होता गारवा ।।

गंध पिउनी धुंद वारा, स्वैर त्याचे नर्तन
चांदण्याचे सूर पिउनि, गाअि सरिता गायन
प्रीतरंगी रंगुनीया, घुमत होता पारवा
रात्र होती चांदणी अन्, मस्त होता गारवा ... १

नेत्र होते दक्ष तेव्हा, शोध तूझा घ्यावया
मुग्ध कलिका अधिर होती, प्रीत अपुली गावया
यौवनाची रागदारी, गात होती मारवा
रात्र होती चांदणी अन्, मस्त होता गारवा ... २

लाज होती लाजरी अन्, भाव होता हासरा
दोन चित्तीं सहजतेने, फुलत होता मोगरा
स्वप्न होते नित्य चित्तीं, तूच रे जवळी हवा
रात्र होती चांदणी अन्, मस्त होता गारवा ... ३

---

• संगीत – बाळ चावरे • गायिका – सुनीती आपटे

# तो दिवस अजूनी आठवतो का तुला

चांदण्यात होता वसंत तेव्हा फुलला
तो दिवस अजूनी आठवतो का तुला ।।

ती तरल वायुची लहर हासरी आली
गंधास बिलगुनी स्पर्शुनि तेव्हा गेली
तू करात माझ्या हात हळुच गुंफिला
तो दिवस अजूनी आठवतो का तुला ... १

पर्णास बिलगुनी कळीच हासत होती
स्पर्शातुन बिजली मादक खेळत होती
धुंदीत सुखाचा स्पर्श कळीला कळला
तो दिवस अजूनी आठवतो का तुला ... २

अेकांती होती रमली तेव्हा प्रीत
बहरलेच होते प्रीतीचे संगीत
तो चंद्रहि तेव्हा हळूच गाली हसला
तो दिवस अजूनी आठवतो का तुला ... ३

## अबोलिचे अन् फूल लाजता

तुझ्या मनातिल मूक भावना, नयनामधुनी मीच वाचतो
अबोलिचे अन् फूल लाजता, मीच खूपसे बोलुन घेतो ॥

हिरवळीतुनि चालत असता, दंवबिंदु मी बनुनी जातो
नाजुक कोमल तांबुस गोऱ्या, पदकमलाचे चुंबन घेतो
पदर अुन्हास्तव डोई घेता, मीच पुरेपुर पोळुन जातो
अबोलिचे अन् फूल लाजता, मीच खूपसे बोलुन घेतो ... १

गीताची तू लकेर घेता, मीच गोडवा त्यातिल बनतो
भावुकभोळचा प्रीतीमधला, भाव अनामिक होअुनि जातो
तुझ्या मनीच्या कमलदलातिल, भृंग प्रीतिचा हळच बनतो
अबोलिचे अन् फूल लाजता, मीच खूपसे बोलुन घेतो ... २

शब्दतारका अुधळिताच तू, अलगद त्याही झेलुन घेतो
हृदयामधल्या प्रीत महाली, अलगद त्यांना ठेवुन देतो
मंद मधुर तू हसता गाली, दुःख मनातिल विसरुन जातो
अबोलिचे अन् फूल लाजता, मीच खूपसे बोलुन घेतो ... ३

## वृथा प्रभूनामे आम्ही बडवितोच टाळ

बंधुचाच अमुच्या आम्ही मानितो विटाळ
वृथा प्रभूनामे आम्ही, बडवितोच टाळ ॥

प्रभू नाहि अप्पलपोटा, प्रभू तो उदार
अन्नपाणि दिधले सर्वा, असो सानथोर
जातपात निर्मुनि आम्ही, तुडवितोच गाळ
वृथा प्रभूनामे आम्ही, बडवितोच टाळ ... १

शुद्ध पाणि उच्चभ्रूला, अशुद्ध ते दीना
अशी हीन करणी अमुची, लाजविते श्वाना
प्रतिष्ठेचि बेंगड अंगा, गळा तुळशि माळ
वृथा प्रभूनामे आम्ही, बडवितोच टाळ ... २

मुखी थोर तत्त्वज्ञान, कुटिल मात्र कर्म
गरीबास मानी क्षुद्र, असा ढोंगि धर्म
गर्दभास आलिंगन अन् बंधुचा विटाळ
वृथा प्रभूनामे आम्ही बडवितोच टाळ ... ३

## माळ अंतरी जपते

मज अेकसारखे स्वप्न सख्याचे पडते
मी सुखद क्षणांची माळ अंतरी जपते ।।

हा गंधित वारा, गूज सांगतो गोड
लागली मनाला, आज सख्याची ओढ
जलथेंब फुलावर, त्यात सख्याला बघते
मी सुखद क्षणांची, माळ अंतरी जपते ... १

या प्रशांत समयी, कोकिळ कूजन करिते
जात्यावर ओवी, कुणी भाविका गाते
रविराज स्वागता, अुषःप्रभा ही नटते
मी सुखद क्षणांची, माळ अंतरी जपते ... २

बघ एकसारखी, फडफडते पापणी
का हाक तयाची, अैकू येते कानी
का संचित मजला, जाण शुभाची देते
मी सुखद क्षणांची, माळ अंतरी जपते ... ३

● संगीत – अशोक पत्की ● गायिका -- माणिक वर्मा

## ओठात गीत आले

सज्जात तू उभी ग, सोडुनि केस ओले
तुज पाहता समोरी, ओठात गीत आले ।।

तव गौरकाय बांधा, कमनीय अन् सुरेख
ते आगळेच रूप, वेधूनि घेइ लक्ष
सौंदर्यशिल्प बघुनी, घायाळ खूप झाले
तुज पाहता समोरी, ओठात गीत आले ... १

लाडीक शब्द ओठी, अन् नाद कंकणाचा
वाटे जणू असे हा, स्वरनाद मैफलीचा
त्या धुंद मैफलीने, मनिचा मयूर डोले
तुज पाहता समोरी, ओठात गीत आले ... २

भालावरी बटांची, नक्षी विलोभनीय
नयनामधील भाषा, गुंफी सुरेख काव्य
वेडा गुलाब त्याचे, सौंदर्यही गळाले
तुज पाहता समोरी, ओठात गीत आले ... ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## स्वप्नातल्या कळ्यांनो

स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा
गोडी अपूर्णतेची लावील वेड जीवा ।।

रेखाकृती सुखाच्या, चित्ती चितारलेल्या
साशंक कल्पनांनी, सहजी विरून गेल्या
कधि सोशिला उन्हाळा, कधि लाभला विसावा
स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा ... १

नैराश्य कृष्णमेघी, आशा कधी बुडावी
विरहात चिंब भिजुनी, प्रीती फुलोनि यावी
काट्याविना न हाती, केव्हा गुलाब यावा
स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा ... २

* सिद्धीस कार्य जाता, येते सुखास जडता
जडतेत चेतनेला, उरतो न कोणि त्राता
अतृप्त भावनांनी, जीवात जीव यावा
स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा ... ३

---

● संगीत – अनिल अरुण ● गायिका – आशा भोसले

* हे कडवे ध्वनिमुद्रिकेत समाविष्ट केलेले नाही.

[library stamp, illegible]

## ध्यास माझा वेगळा

ध्यास माझा वेगळा, अन् विश्व माझे वेगळे
दूर करणे आज मजला, ही रुढीची वल्कले ।।

या अिथे आता सुखाचा, स्वैर वारा खेळु दे
अंधरुढिच्या अंधशाळा, बंद साऱ्या होऊ दे
बेगडी या संस्कृतीचे, व्हायचे ना बाहुले
दूर करणे आज मजला, ही रुढीची वल्कले ... १

या जुन्या वास्तूत आता, तिमिर आहे दाटला
भावनांच्या मुक्ततेला, वाव नाही राहिला
मस्तकी जे छत्र तेही, आज झाले खिळखिळे
दूर करणे आज मजला, ही रुढीची वल्कले ... २

ना कुणी वंचीत व्हावे, या इथे ज्ञानामृता
जन्मता लेखू नये रे, कोणी कुणाची क्षुद्रता
कोंडलेल्या पामरांना, विश्व हे होवो खुले
दूर करणे आज मजला, ही रुढीची वल्कले ... ३

## मी वात होउनि जळते

तू चंद्र नभीचा होता, मी धुंद चांदण होते
तू प्रकाश ज्योती मधला, मी वात होउनी जळते ॥

तू विशाल सागर बनता, मी लहर होउनी डुलते
तू थेंब ढगातिल बनता, मी सरिता होउन हसते
तू फूल प्रीतिचे होता, मी सुवास त्यातिल बनते
तू चंद्र नभीचा होता, मी धुंद चांदणे होते ... १

तू मैफल रंगवितांना, मी तान सुरातिल होते
तू शब्द प्रीतिचे वदता, मी कविता बनुनी जाते
तू कळस कीर्तिचा होता, मी नम्र पायरी बनते
तू चंद्र नभीचा होता, मी धुंद चांदणे होते ... २

तू अबोल केव्हा होता, मी खुळीच होउनि जाते
तू खुदकन हसता गाली, मी लाज लाजुनी जाते
तू धुंद यौवनी रमता, मी तुझीच होउनि जाते
तू चंद्र नभीचा होता, मी धुंद चांदणे होते ... ३

## भंगल्या हृदयात आता

भंगल्या हृदयात आता, जाहलीसे पोकळी
दाटलेली आसवेही, आटली डोळ्यातली ॥

सावळ्या मेघास आता, रंग आला पांढरा
गंध उडुनी अंगणीचा, खिन्न झाला मोगरा
प्रीतिचे ते स्वप्न ठरले, रेघ ती पाण्यातली
दाटलेली आसवेही, आटली डोळ्यातली ... १

हे असे होणार होते, कल्पना होती तुला
मोडण्यासाठीच का तू, खेळ सारा मांडिला
जीवघेणी ती कहाणी, फक्त मागे राहिली
दाटलेली आसवेही, आटली डोळ्यातली .. २

मी तुझ्या गाण्यातुनी रे, गायिली संगीतिका
माधवाला स्मरत होती, नित्य वेडी राधिका
त्या सुखाच्या चांदण्याची, आज झाली काहिली
दाटलेली आसवेही, आटली डोळ्यातली .... ३

## समई उदास झाली

अश्रूत चिंब भिजुनी, झाली अुशीहि ओली
जागून रात्र रात्र, समई उदास झाली ।।

नयनामधील भाषा, मज खूप सांगणारी
हळव्या मनास माझ्या, हलकेच झेलणारी
ह्या पापणीत सारी, स्वप्ने जमून आली
जागून रात्र रात्र, समई उदास झाली ... १

ते सूर जोगियाचे, अैकून चित्त बिथरे
जाताच मी गवाक्षी, हसतात लक्ष तारे
विरहातली नशा ही, माझ्या मनास जाळी
जागून रात्र रात्र, समई उदास झाली ... २

काळोख हा भयाण, जवळी नसे प्रियाही
साथीविना कशी ही, मी रंगवू रुबाई
इष्कात दंग सारे, मी राहिले अकेली
जागून रात्र रात्र, समई उदास झाली ... ३

## स्वरवीणा छेडित ये

स्वरवीणा छेडित य, गात भावगीत
चंद्रफुले अुधळितात, गंध दशदिशात ।।

जाणुनिया काव्य भाव, लाव तू स्वरास
सूरांची मैफल गे, रंगु दे झकास
सुरवेडा पारिजात, डुलत अंगणात
स्वरवीणा छेडित ये, गात भावगीत ... १

लाटांच्या लहरीवर, नाव जशी चाले
घेशि तान सहजपणे, मयुर जसा डोले
स्वर हळवे नादभरी, खुलवि चांदरात
स्वरवीणा छेडित ये, गात भावगीत ... २

दोघातिल प्रेमाचा, भाव गुंफिताना
मूकपणे प्रणयाची, तार छेडितांना
पुनवेसम अविट बहर, चढव मैफलीस
स्वरवीणा छेडित ये, गात भावगीत ... ३

## डोळेच बोलतात

माझ्याविना न कोणी, तुझ्याच अंतरात
बोलू नकोस तूही, डोळेच बोलतात ॥

दुमडून अधर हलके, हळुवार लाजतेस
डाळिंब ते खुलावे, तसीच हासतेस
मी ना खुळाच वेडे, कळले मला क्षणात
बोलू नकोस तूही, डोळेच बोलतात ... १

पडतात मंद मंद, तव पाउले अशी कां
सांगूच वा नको ही, येते मनात शंका
गेलीस बावरून, प्रीती फुले मनात
बोलू नकोस तूही, डोळेच बोलतात ... २

पदरात बोट फिरवी, चाळा खुळाच चाले
वीणेतला जणू हा, मंजूळ सूर बोले
कंठात अडुन बसले, नाजूक प्रेमगीत
बोलू नकोस तूही, डोळेच बोलतात ... ३

## पाहतेच वाट तुझी

पाहतेच वाट तुझी, जागवून रात रात
दाटतात आसवेच, या उदास लोचनात ।।

दाट दाट फिरं तिमिर, वाढवितो खिन्नताच
शेजेवर एकटीस, स्मृति हळव्या टोचतात
मन वेडे होऊि दंग, भलभलत्या कल्पनात
पाहतेच वाट तुझी, जागवून रात रात ... १

शब्द मला देऊनिया, का विलंब लाविलास
कमलिनि ही आतुर रे, भ्रमराला भेटण्यास
विरहाचे दंश सख्या, अंग अंग पोळतात
पाहतेच वाट तुझी, जागवून रात रात ... २

दुःख असे दाहक जे, एकटीच भोगितसे
लागलेच मजला रे, विरहाचे आज पिसे
नच रंगे सूराविण, प्रणयाचे गोड गीत
पाहतेच वाट तुझी, जागवून रात रात ... ३

---

● संगीत – अशोक पत्की ● गायिका – माणिक वर्मा

## सोशीत थंडि वारा

सोशीत थंडि वारा, माराहि पावसाचा
आहे प्रवास चालू, दररोज जीवनाचा ॥

हसऱ्या फुलापरी ते, क्षण हासरे टिपावे
मंजूळशा सुरांचे, नाते सुखे जुळावे
दुःखात पूर येओ, डोळ्यात आसवांचा
आहे प्रवास चालू, दररोज जीवनाचा ... १

हळव्याच भावनांनी, प्रीती कधी जपावी
भावी मनोरथांची, चित्रेच रंगवावी
चाले शिवाशिवीचा, हा खेळ प्राक्तनाचा
आहे प्रवास चालू, दररोज जीवनाचा ... २

कानी कधी पडावे, ते गीत गौरवाचे
बहरून भाव यावे, हलकेच अंतरीचे
अनवाणि चालतांना, आधार सावलीचा
आहे प्रवास चालू, दररोज जीवनाचा ... ३

## फुलांनी गंध शिंपावा

मनीच्या भावना माझ्या, तयांना साक्ष तू झाली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनी आली ।।

सागरी लाट उसळावी, बघोनी चंद्र आभाळी
मनी जे चित्र होते ग, तयाची पूर्तता झाली
होउनी तेच ते चित्र, सुखे तू या घरी आली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनी आली ... १

वृक्ष ना अेकटा आता, भोवती कोवळी वेली
रुक्ष या जीवनी माझ्या, फुलांची बाग गे फुलली
खुषीने गीत गातांना, तयाची तान तू झाली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनी आली ... २

सुखाची पौर्णिमा आता, येअु दे नित्य वाटचाला
कुणाची दृष्ट ना लागो, रेशमी अविट गोडीला
झडोनी जीर्ण पर्णेही, सुखाची पालवी आली
फुलांनी गंध शिंपावा, तशी तू जीवनी आली ... ३

## चंद्रही भारावला

गीतातला शब्द त्याचा, सूर पिउनी रंगला
चांदण्या रात्रीत तेव्हा, चंद्रही भारावला ।।

रंगुनी गाण्यात तेव्हा, पवन वेडा थांबला
लाजणाऱ्या त्या कळ्यांनी, ताल हलके साधिला
रोमरोमातून अवघ्या, सुरही झंकारला
चांदण्या रात्रीत तेव्हा, चंद्रही भारावला ...१

नीलरंगी अंबराला, बघुनि झाला मोदही
दर्दभरली तान ऐकुन, सरून जाते दुःखही
तृप्ततेचा सोहळा तो, रात्रिने उपभोगिला
चांदण्या रात्रीत तेव्हा, चंद्रही भारावला ... २

त्या स्वरांच्या धुंद लहरी, देहभाना विसरवी
त्या सुरामृत प्राशनी ये, जीवन नव पालवी
वाटते संपू नये हा, अविट ऐसा सोहळा
चांदण्या रात्रीत तेव्हा, चंद्रही भारावला ... ३

## तू लाजली झकास

सहजी घडून आले, हे नवल गोड खास
पाहुनिया मला गे, तू लाजली झकास ।।

स्वप्नास पूर्तताही, आता जुळून यावी
थंडीत गोठलेल्या, प्रीतीस ऊब यावी
पहिलीच भेट होता, झाला सुरू प्रवास
पाहुनिया मला गे, तू लाजली झकास ... १

पर्णावरी फुलांनी, मउ शाल पांघरावी
माझ्या मनातली तू, गीते खुषीत गावी
गाण्यात तू रमावे, जाणूनिया समेस
पाहुनिया मला गे, तू लाजली झकास ... २

अव्यक्त भावनांनी, दोघास एक केले
डोळ्यातुनी मनाचे, संदेशही कळाले
हळुवार भावनांचा, वाहे कसा सुवास
पाहूनिया मला गे, तू लाजली झकास ... ३

## धुंद होउनी गाते

तुझे नि माझे सहजी जुळले, आज रेशमी नाते
तू रचिलेले गीत आगळे, धुंद होउनी गाते ।।

कभिन्न काळे मेघ पांगले, हासु लागले तारे
गंध फुलांचा सवे घेउनी, नाचु लागले वारे
स्वप्नपूर्तिच्या निळ्यासागरी, तुझिया संगे येते
तू रचिलेले गीत आगळे, धुंद होउनी गाते ... १

तू शब्दांचा हार गुंफुनी, भाव त्यातुनी सांगे
मनामनाची ओळख पटता, खेळ प्रीतिचा रंगे
तुझ्या मनाच्या सारंगीवर, सूर होउनी येते
तू रचिलेले गीत आगळे, धुंद होउनी गाते ... २

जास्वंदीचा सडा तांबडा, मऊ गालिचा भासे
स्वागत करण्या दोघांचेही, लबाड तोही हासे
तुझ्या सुखाच्या सावलीत मी, तृप्त मनाने न्हाते
तू रचिलेले गीत आगळे, धुंद होउनी गाते ... ३

---

● संगीत – गंगाधर जाधव ● गायिका -- कालिंदी जाधव

## सुमने फुलून आली

पाहून मजकडे तू, हसलीस गोड गाली
वठल्या मनास माझ्या, सुमने फुलून आली ।।

भवताल‍ि दाटलेले, गेले धुके विरून
पर्णावरी दवाचा, आला थवा जमून
बिंदूत त्या दवाच्या, प्रतिमा तुझीच दिसली
वठल्या मनास माझ्या, सुमने फुलून आली ... १

काळोखल्या मनात, पडला उजेड छान
दूरावल्या स्वरांनी, सुचली सुरेल तान
गात्रास या नव्याने, संजीवनी मिळाली
वठल्या मनास माझ्या, सुमने फुलून आली ...२

हळुवार पापणीचा, आला भिजून काठ
सर्वत्र पाहतो मी, माझ्यातला वसंत
मदिरा तुझ्या स्मिताची, पुरती मलाच चढली
वठल्या मनास माझ्या, सुमने फुलून आली ... ३

## अुगवे अुदास प्राची

नाही कधी मिळाली, मज ओल भावनांची
माझ्याच अंगणात, अुगवे अुदास प्राची ... १

रेखाटली मनात, कित्येक रम्य शिल्पे
आकारही न घेता, झालीच राख त्यांची ... २

मी रोविल्या सुरेख, दारात पुष्प वेली
सुटता पिसाट वारा, गेलीच शान त्यांची ... ३

आशा मनात होती, अुगवेल चंद्र दारी
काळोख मस्तवाल, दारात गस्त त्याची ... ४

ओठावरी जरासे, मी आणिलेच हासू
भरतीत आसवांच्या, नुरली स्मृतीच त्याची .. ५

दारी जरी अुद्याला, अुगवेल कल्पवृक्ष
सुकल्या मनास माझ्या, आता न ओढ त्याची ... ६

## सहजी जुळून आले

येताच तू समीप, मी लाजले क्षणात
सहजी जुळून आले, ओठावरीच गीत ॥

होतीच सांजवेळ, होता प्रशांत वारा
वेलीवरी फुलांचा, होता नवा फुलोरा
होताच भेट पहिली, मी जाहले फजीत
सहजी जुळून आले, ओठावरीच गीत ... १

गगनी विहार करुनी, परतूनि पक्षि आले
संध्या नभात अधळी, आरक्त रंग ओले
हसलास मंद जेव्हा, सजली मनात प्रीत
सहजी जुळून आले, ओठावरीच गीत ... २

अुठले मनी तरंग, नाजूक स्पंदनाचे
तू जाणिलेस भाव, या कोवळ्या कळीचे
झाली अबोल बोली, तेव्हा परस्परात
सहजी जुळून आले, ओठावरीच गीत .... ३

## चांदण्या झेलू नको

शर्करावेष्टीत भाषा, तू तिला भाळू नको
बेरडांची रात्र आहे, चांदण्या झेलू नको ... १

दुर्गुणांची येथ चलती, तू मना जाळू नको
सद्‌गुणांचे हार कंठी, आजला माळू नको ... २

बेगडी कोचावरी तू, प्रीतीने लोळू नको
पथ्य पाळी, या अवेळी, सत्य तू बोलू नको ... ३

आग आहे भोवताली, त्यात तू पोळू नको
भामट्यांच्या सोंगट्यांनी, तू कदा खेळू नको ... ४

चालती कैफातुनी हे, तू सवे चालू नको
इष्ट तूझे कार्य तरिही, तू गड्या ढोल नको ... ५

## सरून गेले दिन... मंतरलेले

सरून गेले दिन ते सारे मंतरलेले
चित्र मानसीं फक्त राहिले, विस्कटलेले ॥

पुनवेच्या भरतीत दाटल्या
गढूळलेल्या अता रुबाया
विरून गेले प्रीतीमधले, काव्यचि सगळे
सरून गेले दिन ते सारे, मंतरलेले ... १

कधी आपुली स्पर्धा नव्हती
तरिही गेलिस माझ्या पुढती
सांग जगी का खेळ अेकटा, कुणी खेळले
सरून गेले दिन ते सारे, मंतरलेले ... २

सुगंधात भिजलेली स्वप्ने
फुलण्याआधी त्यांचे मरणे
प्रकाश येण्याआधी अंबर, धुरकटलेले
सरून गेले दिन ते सारे, मंतरलेले ... ३

कुठे जराशी फिक्कट लाली
प्रीतपथावर दिसू लागली
कसे अचानक काजळले नभ, निळेसावळे ... ४
सरून गेले दिन ते सारे, मंतरलेले

## मी तुझ्या गे पैंजणाचा

मी तुझ्या गे पैंजणाचा, मधुर ऐसा नाद व्हावे
मी तुझ्या कंठातुनी गे, गोड मंजुळ गीत गावे ... १

भावनांचे पंख तूझे, मी फिरावे लेवुनीया
मी तुझ्या डोळ्यातुनी गे, अर्थ सारे ओळखावे ... २

हळव्या तुझ्या स्पर्शातले, रेशमी रोमांच व्हावे
ओठातल्या शर्करेचा, मी मधू होऊन जावे ... ३

प्रीतिच्या कैफात तूझ्या, मद्य मी होऊन जावे
लाजऱ्या तव भावनेतिल, काव्यही होऊन जावे ... ४

तव सुरंगी वेणीतला मी, धुंद ऐसा गंध व्हावे
सावलीसम नित्य मीही, संगती तूझ्या असावे ... ५

## वीणेतल्या स्वरांनो

माझ्या प्रियासवे मी, गाणारची झकास
वीणेतल्या स्वरांनो, होऊ नका उदास ।।

सारे धुके मनीचे, आता पुरे निमाले
ते धवल चांदणेही, दारी फुलून आले
वाहे भरून सगळा, शब्दातला सुवास
वीणेतल्या स्वरांनो, होऊ नका उदास ... १

येथे कळचाकळचांची, झाली फुले सुरेख
नाही कुठे मनाला, कसलाहि आज डंख
तृप्तीत भावनांच्या, माझा सुखी प्रवास
वीणेतल्या स्वरांनो, होऊ नका उदास ... २

दारात आज बहरे, ती वेल अमृताची
आकंठ वाहताहे, गोडी इथे सुखाची
काळोख संपलासे, थारा न आंसवास
वीणेतल्या स्वरांनो, होऊ नका उदास ... ३

[library stamp, illegible]

## गाअु नका कोणीही

छळिती मज रात्रभरी, विरहाच्या आठवणी
गाअु नका कोणीही, प्रणयाची मधुगाणी ।।

मिणमिणता हा प्रकाश, करित नित्य मज उदास
शेजेवर चुरगळला, मोगरिचा मधु सुवास
अंधारी अेकटीच, सोबतीस ना कोणी
गाअु नका कोणीही, प्रणयाची मधुगाणी ... १

मिटता हे नयन मला, चित्र दिसे रायाचे
वैरिण ही रात्र मला, खेळ दावि नियतीचे
कोंडताच भाव गळे, डोळ्यातुन पाणी
गाअु नका कोणीही, प्रणयाची मधुगाणी ... २

वेदना मनातल्या, कुणास सांगु ना कळे
प्रीतीचे धवल शांत, चांदणेहि दूर पळे
विरहाने बावरली, हसणारी फुलराणी
गाअु नका कोणीही, प्रणयाची मधु गाणी ... ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०४
दा. क्र. २०९८९
काव्य २४५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024189
REFBK-0024189

## गाणे तुझेच यावे

तू गुंफिल्या स्वरांनी, गीतास मोल यावे
ओठातुनी सुरेल, गाणे तुझेच यावे ।।

पुष्पासमान छान, रचिलीस गीतमाला
माझ्या मनास त्याने, आला नवा तजेला
स्वप्नील भावनांचे, ते स्वप्न पूर्ण व्हावे
ओठातुनी सुरेल, गाणे तुझेच यावे ... १

आल्या फुलून माझ्या, संवेदना गुलाबी
हळुवार भावनांची, चढली नशा शराबी
हे गीत प्रेमिकांचे, गाओन प्रेम भावे
ओठातुनी सुरेल, गाणे तुझेच यावे ... २

मधुभाव अंतरीचे, गीतातुनी फुलावे
धुंदीतल्या स्वरांनी, बहरून भाव यावे
मैफील रंगतांना, ते चांदणे हसावे
ओठातुनी सुरेल, गाणे तुझेच यावे ... ३

• संगीत – अनिल मोहिले • गायिका -- संगीता खोत